नि.फौ.ख.क्र.१३३ /२०२२
सरकार वि.नाराय
नि.क्र १६

साक्षीदार क्र ०१ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :– पांडुरंग आनंदरावजी उईके
वय:–३२ वर्ष, व्यवसाय– मजुरी
राह.महालगाव, ता.भिवापु र , जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

१. दिनांक २७/०५/२०२२ रोजी पोलीसांनी कुठे बोलविले नव्हते .माझे समक्ष पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते व माझे समक्ष घटनास्थ्ळ व जप्ती पंचनामे तयार केले नाही. मी आरोपीला ओळखत नाही. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. मजकुर मला माहित नाही. सहीपुरता नि.क्र.१७ देण्यात आला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की मला पोलीसांनी दिनांक २७/०५/२०२२ रोजी महालगाव येथील डांबरी रोडवर पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझे समक्ष आरोपीने फिर्यादीला हत्याराने तसेच हातबुक्कीने मारपीट केल्याबाबत घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. मी नंदु धोटेला ओळखतो तो पंचनाम्याचे वेळेस हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की त्याचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा माझेसमक्ष तयार केला होता. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. आर.बी.भोंबे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२४/०३/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड